# न आटणारा वनराई बंधारा

**राजेंद्र शेंडे**
अध्यक्ष
**तेर पॉलिसी सेंटर (TERRE)**
माजी संचालक
**संयुक्त राष्ट्रसंघ**
**पर्यावरण विषयक कार्यक्रम (UNEP)**



**"धारियाजींच्या समर्पून काम करण्याच्या विस्मयकारक वृत्तीच्या आशीर्वादामुळे वनराई बंधाऱ्यातील पाणी कधीच कमी होणार नाही. धारियाजींच्या आणि वनराई कार्यकर्त्यांच्या दृढनिश्चयाने पुरेपुर भरलेल्या पोत्यांनी आडविलेल्या वनराई बंधाऱ्यात साठलेले पाणी कायम तसेच राहील, यात कसलीही शंका नाही..."**

पद्मविभूषण मोहन धारियाजींच्या दुःखद निधनाची बातमी मला १५ ऑक्टोबर रोजी पॅरिस येथे समजली. त्यावेळी 'वनराई'तील वृक्षवल्लींच्या पानांची सळसळच जणू स्तब्ध झाली आहे, असे वाटले.

धारियाजींच्या प्रत्येक भेटीत त्यांच्याशी बोलताना मला वनराईतील पानांची सळसळ आणि वृक्षांच्या हलणाऱ्या फांद्यांचा प्रेरित करणारा आवाज ऐकल्याचा भास व्हायचा. तो आवाज सदाहरित असायचा. मी नेहमी या गोष्टीचा आनंद घेतला याचे कारण म्हणजे धारियाजी नेहमीच आनंददायी असायचे. त्यांच्या वयाची माणसे सहसा स्वतः विषयी आत्मस्तुतीच्या बढाया मारतात; मात्र धारियाजींच्या बोलण्यात कधीही आत्मप्रौढी वा आत्मस्तुतीचा अविर्भाव नसे. ते नेहमीच त्यांच्या नवीन कल्पना, अपुरे प्रकल्प, त्यांच्या ग्रंथलेखनाविषयीच्या योजना, त्यांना आलेले अनुभव आणि त्यापासून मिळालेले धडे यांविषयी बोलत असत. तसेच, पुण्यात आणि महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांमध्ये तळमळीने काम करणाऱ्या त्यांच्या कार्यकर्त्यांच्या फळीविषयीही ते बोलत असत. कार्यकर्त्यांच्या सहकार्याशिवाय 'वनराई' संस्था उभारणे शक्य झाले नसते, असे ते नेहमी सांगत असत.

**ऐतिहासिक 'हरित' मंत्री**

स्वतंत्र प्रजासत्ताक भारताच्या इतिहासात धारियाजींसारखा 'हरित' नियोजन मंत्री तसेच व्यापार मंत्री

अजून पर्यंत झालेला नाही. वयाबरोबर त्यांचा हरितपणा अधिकाधिक 'गडद हरित' होत गेला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक कार्यक्रमातील अद्ययावत विचारप्रवाहांविषयी माझ्याकडून जाणून घेण्यास ते नेहमीच उत्सुक असत. ते बऱ्याचदा १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे पार पडलेल्या 'ह्यूमन एन्व्हायरन्मेंट' या परिषदेची आठवण काढत असत. जगातील अनेक देशांच्या प्रमुखांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या पहिल्या परिषदेमध्ये पर्यावरण, दारिद्र्य आणि विकास या विषयांवर साकल्याने विचार-विनीमय केला गेला. त्यानंतर १९७० च्या दशकामध्ये धारियाजींना त्यांच्या पक्षामध्ये 'तरुण तूर्क' म्हणून ओळखले जात असे. त्या काळात मी आयआयटी, मुंबई येथे शिकत असताना मोठ्या आवडीने धारियाजींचे विचार वाचत आणि त्यावर इतर विद्यार्थ्यांबरोबर विचारविमर्श करत असे.

**प्रोत्साहनपर कौतुक करणारे डॉ. धारिया**

इतरांनी केलेल्या कामाचे कौतुक करणे, हा धारियाजींच्या स्वभावाचा एक महत्त्वाचा पैलू होता. मला अमेरिकेमध्ये मिळालेल्या पारितोषिकाबद्दल जेव्हा त्यांना समजले, तेव्हा त्यांनी व्यक्तीशः मला त्यांच्या कार्यालयात बोलाविले आणि माझा सत्कार केला, तसेच वनराईच्या वार्षिक विशेषांकात त्यांनी मला नवे पर्यावरण आणि विकास या संकल्पनेबाबत लिहिण्यास सांगितले होते. रहिमतपूरच्या दिशादर्शक प्रकल्पाबाबतही त्यांना विशेष आस्था होती.

१५ ऑक्टोबर २०१३ रोजी म्हणजेच धारियाजींच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशी पॅरिसमध्ये एक परिषद भरली होती. पॅरिस शहर सोडून फ्रान्स देशाच्या ग्रामीण भागात परत राहण्यासाठी गेलेल्या व्यक्तींचा त्या परिषदेत सहभाग होता. दरवर्षी २० हजार फ्रेंच लोक शहर सोडून गावांकडे स्थलांतरित होतात आणि आव्हानात्मक जीवन जगतात, असे या परिषदेमधून मला समजले. धारियाजी नेहमीच शहरांकडून गावाकडे स्थलांतर म्हणजेच 'रिव्हर्स मायग्रेशन'चा पुरस्कार करीत असत. त्यांना ही बातमी ऐकून निश्चितच आनंद झाला असता.

खेद एवढाच वाटतो की, भारत २०१४ मध्ये एका अनोख्या उंबरठ्यावर उभा आहे. राजकीय सत्तांतर व स्थित्यंतर जेव्हा होईल तेव्हा धारियाजींचे मार्गदर्शन तरुण पिढीला उपलब्ध नसेल; परंतु एक निश्चित की, धारियाजींच्या समर्पून काम करण्याच्या विस्मयकारक वृत्तीच्या आशीर्वादामुळे वनराई बंधाऱ्यातील पाणी कधीच कमी होणार नाही. धारियाजींच्या आणि वनराई कार्यकर्त्यांच्या दृढनिश्चयाने पुरेपुर भरलेल्या पोत्यांनी आडविलेल्या वनराई बंधाऱ्यात साठलेले पाणी कायम तसेच राहील, यात कसलीही शंका नाही. ते पाणी तरुण पिढीला जीवनाची दिशा दाखवणारे ठरेल.

***

## प्रत्यक्ष कृतीवर भर देणारा 'महर्षी'



जीवनाच्या अत्यूच्च टप्प्यावर असताना श्री. मोहन धारिया यांना बोलावणे आले. त्यांना मी प्रेमाने 'महर्षी' म्हणत असे. त्यांची राजकीय सुक्ष्मदृष्टी उत्कंठापूर्ण आणि भेदक होती. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी खूप मोठा त्याग आणि प्रचंड यातना सोसल्या आहेत. त्यांनी नेहमीच बंधुत्व आणि वैयक्तिक स्वातंत्र्यावर विश्वास ठेवला. ते दिखाव्यापेक्षा प्रत्यक्षात कृतीवर भर देणारे आणि ढोंगीपणाला कसलाही थारा न देणारे होते. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेल्या डॉ. धारियांना राष्ट्राची खरी ताकद काय आहे याची चांगली पारख होती. अशा डॉ. धारियांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- जे. पी. वासवानी, साधू वासवानी मिशन**